निशाणी क्र. ४०/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - धमेंद्र काळुराम पिंगळे, |
| वय | - ४७ वर्षे, |
| व्यवसाय | - सिव्हील कॉन्ट्रॅक्टर, |
| राहणार | - धामणी, ता. खालापूर, जि. रायगड. |

**<u>सरतपास सरकारी वकील श्रीमती सायली चव्हाण यांचे मार्फत शपथेवर सुरु....</u>**

१) मी फिर्यादीला ओळखतो. फिर्यादी आवेज मुस्ताफ सुरती यांची पत्र्याचे डबे बनविण्याची कंपनी ढेकू येथे होती. आवेज सुरती यांची धामणी येथे जागा आहे. ती जागा ४ ते ५ एकर असेल. त्या जागेचे मुळ मालक काळुराम पिंगळे म्हणजे माझे वडील हे होते. ती जागा माझ्या वडीलांनी आवेज सुरती यांना विकली होती. त्या जमिनीवर भरावाचे काम मी घेतले होते. ९ वर्षांपूर्वी तारीख माझ्या लक्षात नाही दुपारी ०२:०० ते ०३:०० वाजण्याच्या सुमारास मी काम चालू असलेल्या ठिकाणी असताना डंपर अडवण्यात आले होते. ते डंपर योगेश चोगले, राकेश चिले, यांनी अडवले होते त्यावेळी त्यांच्यासोबत अजुन २ ते ३ जण होते. त्यावेळी ते मोटरसायकल वरुन आले होते. त्यानंतर काहीही झाले नाही. त्याबाबत सुरती यांनी तक्रार दिली होती. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. जबाब नोंदवला होता. आरोपींना पाहील्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र. १ व २ आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. टी. यु. परबळकर यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना नावानिशी ओळखत नाही. (आज न्यायालयासमोर हजर असणा-या आरोपींची नावे चेतन चोगले व राकेश चिले अशी आहेत.) हे म्हणणे खरे आहे की, ती जमीन काळुराम पिंगळे यांच्या मालकीची होती हे दाखवणारे

कागदपत्र मी पोलिसांना तपासादरम्यान दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, भरावाचे काम करण्याची कोणतीही वर्क ऑर्डर मला भेटली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कोणतीही वर्क ऑर्डर मी तपासादरम्यान पोलिसांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्यानुसार घटना ०२:०० वा. च्या सुमारास घडली. मोटरसायकल कोणाच्या मालकीची होती तिचा नंबर काय होता हे मला सांगता येणार नाही. डंपरचा नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला डंपर कोणाच्या मालकीचा होता हे सांगता येणार नाही. चालकाचे नाव देवकर असे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी नक्की किती आरोपी होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.01.20 17:51:43 +0530

( डी. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - २०/०१/२०२६

निशाणी क्र. ४१/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - संजय तुकाराम पाटील, |
| वय | - ४० वर्षे, |
| व्यवसाय | - बिल्डींग मटेरीयल सप्लायर, |
| राहणार | - सारसंग, ता. खालापूर, जि. रायगड. |

**<u>सरतपास सरकारी वकील श्रीमती सायली चव्हाण यांचे मार्फत शपथेवर सुरु....</u>**

१) मी सारसन येथे माझ्या कुटूंबासह राहतो. माझ्या मामाच्या मालकीचा श्री. साई बिल्डींग मटेरीयल सप्लायर्सचा व्यवसाय आहे. त्यावेळी आमच्याकडे डंपर जेसीबी या सारखी वाहने होती. घटनेची तारीख मला आठवत नाही. त्या दिवशी धामणी गावामध्ये सुरती यांच्याकडे भरावाचे काम चालू होते. त्या दिवशी मला डंपर चालक चंद्रकांत देवकर याचा फोन आला. त्यावेळी त्याने मला सांगितले की, डंपर अडविला आहे. त्यानंतर मी त्या ठिकाणी गेलो. मला तेथे जायला वेळ झाला होता. त्यामुळे मला घटनेबद्दल काहीही माहित नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. माझा जबाब नोंदवला होता. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी त्या प्रमाणे का लिहीला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही.

**( साक्षीदार त्याच्या पोलीसांसमोरील जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

हे म्हणणे खरे नाही की, दि. १०/५/२०१६ रोजी मी माझे सर्व डंपर व जे.सी.बी. घेवून सुरती यांच्या धामणी येथील जमीनीमध्ये भरावाचे काम करत असताना दि. १८/०५/२०१६ रोजी आरोपींनी मोटरसायकल रस्त्यात आडवी लावून माझ्यासमक्ष डंपर अडूवन जागा मालक सुरती यांना शिवीगाळ व दमदाटी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा प्रकार मी स्वतः पाहीला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी

आरोपींना स्वतः अडवण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचे असल्याने त्यांना वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. टी. यु. परबळकर यांचेमार्फत सुरु...**

२) हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहीलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे नक्की काय झाले हे मला माहित नाही.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.01.20 17:51:53 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक - २०/०१/२०२६

निशाणी क्र. ४२/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - चंद्रकांत गुरुलिंग देवकर, |
| वय | - ५५ वर्षे, |
| व्यवसाय | - वाहन चालक, |
| राहणार | - शांतीनगर, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड. |

**सरतपास सरकारी वकील श्रीमती सायली चव्हाण यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी संजय तुकाराम पाटील यांना ओळखतो. ते माझे मालक आहेत. मी त्यांच्या डंपरवर चालक म्हणून काम करतो. घटना अंदाजे ९ वर्षांपूर्वी घडली होती. त्यावेळी धामणी गावाच्या जवळ भरावाचे काम चालू होते. ती जागा कोणाच्या मालकीची होती हे मला माहित नाही. डंपरचा नंबर एम.एच. ४६/२११३ असा होता. त्यावेळी धामणी गावातील लोक मोटरसायकल डंपरच्या आडवी लावत होते. त्यावेळी ते माझ्या अंगावर मला मारण्यासाठी येत होते त्यामुळे मी संजय पाटील यांना फोन करुन सांगितले. मी त्या लोकांना ओळखत नाही. त्यावेळी किती लोक होते हे मी सांगू शकत नाही. मी मोटरसायकलचा नंबर सांगू शकत नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. माझा जबाब नोंदवला होता. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी त्या प्रमाणे का लिहीला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही.

**( साक्षीदार त्याच्या पोलीसांसमोरील जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

हे म्हणणे खरे नाही की, दि. १०/५/२०१६ रोजी मी सुरती यांच्या धामणी येथील जमिनीमध्ये भरावाचे काम चालू असल्याने डंपरवर चालक म्हणून काम करत असताना दि. १८/०५/२०१६ रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास मी डंपर मध्ये

माती भरुन जात असताना धामणी गावातील आरोपी क्र. १ ते ४ यांनी गाडी आडवी लावून माझा रस्ता अडवला व जागा मालक सुरती यांना शिवीगाळ व दमदाटी करुन मला सुध्दा शिवीगाळ दमदाटी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचे असल्याने त्यांना वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. टी. यु. परबळकर यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे आहे की, जबाबात पोलिसांनी काय लिहीले होते हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला डंपरचा पूर्ण नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी संजय पाटील यांच्याकडे चालक म्हणून काम करतो हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा मी पोलिसांना तपासादरम्यान दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी गाडी अडवणारे लोक कोण होते त्यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला मोटरसायकलचा नंबर तसेच मोटरसायकलचा चालक मालक कोण होता हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.01.20 17:52:01 +0530

( डी. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - २०/०१/२०२६